डॉ. नागेश टकाळे

# वसुंधरेचे वस्त्रहरण थांबवा

माझे ग्रामीण जीवन मराठवाडयामधील दोन लहान खेडयात गेले. एक माझे मुळचे शालेय शिक्षणाचे गाव तर दुसरे आजोळ जेथे मी दिवाळी, उन्हाळी सुट्टीसाठी प्रतिवर्षी आई आणि भांवडासह जात असे. तो माझा मामाचा गाव होता. काळ होता १९५५ ते १९६४ म्हणजे तब्बल सहा दशकापुर्वीचा. माझ्या गावचे मुख्य वैशिष्ट म्हणजे गाव परिसरात असलेल्या शेकडो आंब्याच्या बागा. वडील सांगत ही आम्रवृक्षांची संख्या अगणित म्हणजे पाच लाखाच्या वर होती. प्रवाशांना जवळ येइपर्यंत आमराईमध्ये लपलेले गाव दिसत नसे. चुलीमधून बाहेर पडणारा धूर ही परिसरामधील गावांचे आस्तित्व ओळखण्याची एकमेव खूण होती. माझे छोटे गाव म्हणजे हरित वस्त्राने नटलेल्या वसुंधरेची एक छोटी प्रतिकृतीच होती. कायम गर्द हिरव्या रंगाचे वस्त्र परिधान केलेली ही माझी आई खरिप, रब्बी आणि उन्हाळयामध्ये तिच्या हिरव्या साडीवरील वेलबुट्टी नियमितपणे बदलत असे. आषाढ, श्रावणातील रिमझिम पाऊस तिच्या साडीवर पांढरे शुभ्र आकर्षक ठिपके निर्माण करत असे तर नवरात्रात सर्व शेतात पिवळया रंगाची आकर्षक वेलबुट्टी काढत असे नतंर त्यात सूर्यफूल, मोहरी, हादगा यांच्या सौंदर्याची भर पडत असे. वसंतामध्ये आमच्या या वसुंधरेचे रुप विविध रंगाबरोबर सुगंधाने नटून निघत असे. गावच्या पुर्व पश्चिमेकडील बारमाही खळाळत वाहणाऱ्या दोन नद्या तिच्या हातामधील कंकणाचा निनाद करत असत. असेच वसुंधरेचे सौंदर्य माझ्या आजोळी होते. घरामधून चार पावले दूर गेले की आमची वृक्षभेट होत असे. कितीतरी जाई, जुई, मोगरा, काटेकोरंटी, पारिजातक आम्हाला बोलावत असत. दोन मोठया नांद्रुक वृक्षाच्या मागे माझी शाळा लपलेली होती ती



जवळ येईपर्यंत दिसतच नसे. मधल्या सुट्टीत या झाडावरुन त्या झाडावर सुरपारंब्यांचा खेळ चाले. अनेक वेळा पक्षांची शाळा वर तर खाली आमचा वर्ग असे चित्र असे. वृक्षाचे मोठमोठे खोड ही आमची लपाछपीची जागा. गावाबाहेर माळरानावर चरणारी गुरे, वाहत्या पाण्याचे नादमधूर संगीत, झाडीत लपलेला सुर्योदय आणि सुर्यास्त, आसमंतात पसरलेली संध्याछाया हे माझ्या लहानपणच्या आठवणीमधील मनामध्ये साठविलेले वसुंधरेचे विलोभनिय रुप. आज मात्र तिचे वस्त्रहरण पाहताना डोळयामधून ओघळणारे अश्रु थांबतच नाहीत. गाव परिसरात एकही आंब्याचे झाड नाही. कुठे गेली ती पाच लाखांच्या वरची आम्रवृक्षांची श्रीमंती. नदी रुपामधील हातातील कंकणे केव्हाच थांबली आहेत. शाळेची इमारत वाढवण्यासाठी, खेळाचे मैदान विकसीत करण्यासाठी त्या दोन प्रचंड मोठया नांद्रुक वृक्षांचा बळी गेला आणि आमची लपाछपी, सुर पारुंबा हे खेळ शब्द कोषात जमा झाले. वृक्षच नाही तर पक्षी कोठून येणार! आजोळी जाण्याची हिम्मतच नाही कारण संपुर्ण गाव, तेथील मोठमोठे वाडे, हवेल्या आणि घनदाट वृक्षराजी सर्वच धरणाखाली गेले आहे. गावे आणि तेथील निसर्गास उध्वस्त करुन निर्माण होणारे महामार्ग, मोठमोठी धरणे मला वसुंधरेच्या श्वेत वस्त्रावरील बेढभ ठिगळे वाटतात. निसर्गाचे हे किती विद्रुप स्वरुप आहे. ठिगळांची साडी हे विकासाचे प्रतिक म्हणावे की आमच्या दळिद्रीं श्रीमंतीचे खोटे लक्षण!

वसुंधरेच्या वस्त्रहरणाची ही दोन उदाहरणे आज प्रत्येक संवेदनशील नागरिकांच्या मनाला निश्चितच वेदना देणारी आहेत पण या वेदना या गावापुरत्याच मर्यादित आहेत का? उत्तर अर्थातच नकारार्थी आहे ही दोन गावे भारतातील ५,९७,४८३ खेडयांचे प्रतिनिधित्व करतात. या संख्येतील ८२१४९ गावे ज्यांची लोकसंख्या २०० पेक्षाही कमी आहे, जेथे अजून विकास पोहचलाच नाही तेथे आज तरी वसुंधरेचे हरित वस्त्राने लज्जा रक्षण झालेले आढळते. विशेष म्हणजे दुर्गम भागामधील गरिब अदिवासींना स्वतःचेच लज्जारक्षण कसे करावे याची चिंता असताना तेथे वसुंधरा मात्र नेहमीच भरगच्च श्रीमंत वृक्ष वेलीच्या लेण्याने नटलेली असते हा यातील प्रचंड मोठा विरोधाभास आहे.

वसुंधरेच्या हरित वस्त्र लेण्यामध्ये वृक्ष संपदा, डोंगर, दऱ्या, खळखळ वाहणाऱ्या नद्या, शुभ्र धबधबे, पर्वतराजी आणि ध्रुविय प्रदेशामधील श्वेत चादर आणि या सर्वात अधिकाराने वावरणारे प्राणी, पक्षी, फुलपाखरे, कीटक, जलजीव त्याचबरोबर विविध गवताळ कुरणे, वाळवंटे, परिसंस्था, संवेदनशील पाणथळ जागा, सरोवरे, घनदाट जंगले आणि त्यामध्ये हजारो वर्षापासून रुजलेली पारंपारिक शेती वसुंधरेच्या अखंड वस्त्रावरील ही वेगवेगळी बुट्टी आहे आणि या बुट्टीमुळेच वस्त्राची आकर्षकता वर वाढतेच पण त्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमध्ये ते वस्त्र विशेष खुलून दिसते.

वसुंधरेचे वस्त्रहरण होण्यासाठी मानवी हव्यास आणि त्याचा विकासाच्या मागे वेगाने धावणारा रथ जबाबदार आहे. विकास आणि निसर्ग ही मनुष्य सारथ्य करत असलेल्या या रथाची दोन सारख्या आकाराची आणि व्यासाची चाके आहेत आणि यामुळेच या रथाला योग्य वेग आणि दिशा प्राप्त होते, त्याला कुठे थांबावयाचे हे कळते पण गेल्या पाच सहा दशकापासून या रथाच्या विकास चाकाचा व्यास मोठा होत आहे आणि निसर्ग चाक लहान होत त्याच्याबरोबर  लोंबकाळत जात असल्याचा भास होत आहे. विकास चाकामधील आऱ्यांची संख्या वाढत आहे तर निसर्ग चाकामधील एक एक आरी निखळून पडत आहे त्यामुळेच वातावरण बदलाच्या मोठमोठया खड्डयामध्ये हा विकासरुपी रथ कोलमडत आहे. वाढते वैश्विक उष्णतामान त्याला थोपवण्याचा प्रयत्न करत आहे मात्र विकास हेच एक ध्येय समोर ठेवून अडथळयांची शर्यत



पार पाडण्याचे या रथाचे उदिष्टय कधी यशस्वी होणार नाही हे दुर्देवाने त्यांच्या लक्षात येत नाही. ही परिस्थिती भारतासारख्या विकसनशील देशापुरतीच मर्यादित नसुन यामध्ये विकसीत आणि गरिब राष्ट्रे सुध्दा या वस्त्रहरणामध्ये सामिल होत आहेत. मी अनेकवेळा वसुंधरेच्या वस्त्रहरणास महाभारतामधील द्रोपदीच्या रुपात पाहतो. विविध राष्ट्रामधील सुदृढ निसर्गास नष्ट करणारे राज्यकर्ते मला दु:शासनाच्या भुमिकेत दिसतात आणि श्रीकृष्णाच्या भूमिकेत मला वातावरण बदल दिसत आहे. तो दु:शासनास थांब ! थांब असे सातत्याने इशारा देत आहे. आज वसुंधरेच्या वस्त्रहरणामुळेच अती गरिब राष्ट्रांची परिस्थिती हलाखीची झाली आहे. त्यांच्या समोर अन्न सुरक्षा आणि भूक बळीचे संकट उभे आहे ज्यात सहा वर्षाखालिल मुले जास्त संवेदनशील आहेत. भूगर्भामधील पाण्याचा उपसा, खाण कामामधून जंगले उध्वस्त करुन लोह, मॅगेनिज, जस्त या सारखी खनिजे वसुंधरेच्या पोटातून बाहेर काढणे, नदयांचे मार्ग बदलणे, संवेदनशील भागात जलविद्युत प्रकल्प उभारणे हे विकास उद्योग वसुंधरेचे वस्त्रहरणच आहे. समुद्र किनारी विकास म्हणजे महासागरास आत येण्यास आमंत्रण दिल्यासारखेच आहे. आज कोकणामधील ४० टक्के उध्वस्त पश्चिम घाट, त्याचीच कर्नाटक, केरळमधील पुनरावर्ती, समुद्राच्या भरतीमुळे हजारो एकर शेती क्षेत्र नापीक होणे हे सुध्दा वस्त्रहरणच आहे. वाढत्या तापमानामुळे उत्तर दक्षिण ध्रुवावरील बर्फ वेगाने वितळत आहे. ग्रिनलँड सारखा देश पुढील ३-४ वर्षात आर्टिक समुद्रात बुडून जाणार असून येत्या दशकात समुद्र पातळी काही इंचावरुन दहा फुट उंचीपर्यंत वाढणार आहे मग मुंबई, चेन्नई सारख्या महानगरांचे काय होणार? बांगला देश आणि तेथील सुंदरबन राहणार का? कराची कुठे जाणार? हे सर्व प्रश्न श्रीकृष्णाच्या भुमीकेमधील वातावरण बदल आज वसुंधरा वस्त्रहरणासंबधी मानवरुपी दु:शासनास विचारत आहे. उत्तर आम्हाला माहित आहे पण आमच्या विकास या ध्येयापासून आम्ही एक इंच पण मागे येण्यास तयार नाही. ही वसुंधरेची शोकांतिका आहे. विकासाच्या नावाखाली आज ३५ टक्के ॲमेझॉन दिवस रात्र जळत आहे, हाच प्रकार पश्चिम ऑस्ट्रेलियात सुरु आहे. हे वसुंधरेच्या अंगावर

भाजलेले व्रण नव्हेत काय? रशिया, युक्रेन युध्दात युक्रेनची १७ टक्के निसर्ग संपदा नष्ट झाली, आम्ही मानवी मृत्यू टाळत आहोत असे म्हणताना वसुंधरेचे हरित वस्त्र पेटवत आहोत हे क्रुर सत्य नव्हे काय?

वातावरणामध्ये उत्सर्जित होणारे हरितगृह वायू वसुंधरेच्या वस्त्रास मलीन करत आहेत. रासायनिक शेती, कीटकनाशकांचा दर्प सर्वत्र पसरत आहे. फुलांचे आकार वाढत आहेत मात्र सुगंध हरवला आहे. लहान सुंदर पक्षी भितीखाली जगत आहेत, त्यांची संख्या लक्षणिय पध्दतीने रोडावत आहे. कचऱ्याचे डोंगर तयार होत आहेत आणि 'पर्वतस्य स्तन मंडले' असलेल्या आमच्या पृथ्वीमातेच्या डोंगर टेकडया उघडया बोडख्या झाल्या आहेत, वाहत्या नद्यांमधील वाळू उपसा झाल्यामुळे नद्याही थांबल्या आणि वाळूही संपली आणि त्याची जागा डोंगर फोडून घेतली जात आहे हे वसुंधरेचे वस्त्रहरण नव्हे काय? नष्ट झालेल्या पाणथळ जागा, विंधन विहिरीची वाढती संख्या, वाढणारी, फुगणारी शहरे, आक्रसत जाणारा ग्रामिण भाग, नष्ट होत असणारी पारंपारिक पीके, प्रदुषण ओकणारे उदयोग धंदे, सुखवस्तू जीवनशैली, हरितक्षेत्र झपाटयाने कमी होणे, वाळवंट क्षेत्रात होणारी वाढ, प्राण्यांचा अधिवास हरवणे, मनुष्य प्राणी संघर्ष, त्यात प्राण्यांचा पराभव यामुळे वसुंधरेचे हरित वस्त्र जिर्ण होत आहे, त्यावर छिद्रे पडत आहेत त्याला ठिगळे तरी किती लावणार? हे वस्त्रहरण, त्याची कारणे, उपाय शोधण्यासाठी नेहमी चर्चा घडतात, कार्यशाळा होतात, पॅरिस सारख्या जगामधील एक सुंदर सुगंधी शहरात या वस्त्राहरणावर जगभरामधील दोनशे राष्ट्रांनी परिषद होते. अफ्रिकेमधील गोर गरिब राष्ट्रे विकसीत राष्ट्रासमोर अश्रुपात करतात तर विकसीत राष्ट्रे त्यांच्याकडे पहात कुच्छित नजरेने हसताना विकसनशील राष्ट्रांकडे बोट दाखवितात तर विकसनशील राष्ट्रे विकसीत राष्ट्राकडे वसुंधरेसाठी नवीन हरित पैठणी निर्माण करण्यासाठी मदतीच्या रुपाने भिकेचा वाडगा पुढे करतात आणि सोबत २०७० पर्यंत आम्ही ही नवीन पैठणी तयार करु असे गुलाबी आश्वासन ही देतात पण पुढील ३५ वर्षात कुणी हे जग पाहिले आहे. पर्यावरण संवर्धन आणि संरक्षण मध्ये जगभरात स्त्रियांचा सहभाग नेहमी जास्त राहिलेला आहे पण याचा अर्थ असा नाही की स्वीडन मध्ये एखादी ग्रेटा थनबर्ग आणि भारतात एक भूमि पेडणेकर तयार व्हावी. एक स्त्रीच दुसऱ्या स्त्रीचे लज्जारक्षण करते हा आपला इतिहास आहे म्हणून वसुंधरेचे वस्त्रहरण रोखण्याचे कार्य फक्त स्त्रीयांनीच करावे आणि पुरुषांनी बघ्यांची भुमिका घ्यावी उलट या दोघांनीही या वस्त्राचे ओझे एकत्रपणे खांदयावर घ्यावयास हवे मात्र दुर्दैवाने असे घडताना आढळत नाही. आज तरी आम्ही आमच्या वसुंधरेसाठी श्वेत वस्त्राचीच तयारी सुरु केली आहे असे मला वाटते. अशी श्वेत वस्त्रामधील वसुंधरा आम्ही येणाऱ्या पिढीच्या हवाली करणार का? विद्यार्थ्यांच्या अभ्यासामध्ये सुदृढ निसर्ग आणि पर्यावरण यावर अनेक धडे असतात पण त्यांना सुदृढ निसर्ग दाखविण्यास आई वडिलाकडे तेवढा मौल्यवान वेळ तरी आहे काय? आणि सर्वात महत्वाचे म्हणजे असा सुदृढ निसर्ग कुठे पाहण्यास तरी मिळतो का? कुठेतरी एखादया मामाच्या गावचे आम्ही चारपाच हजार रुपयाचे तिकीट काढून जातो आणि हीच ती सुदृढ वसुंधरा म्हणून पाल्ल्यांची फसवणूक करतो. निसर्ग हा वर्गात बसून पुस्तकाच्या धडयामधून शिकण्याचा विषय आहे काय? मामाच्या गावामधून तो उमगतो का? अनेक वेळा असा प्रवास मला पाल्ल्यांच्या आई वडिलासाठीच एक विरंगुळयाचा प्रयत्न आहे असे वाटते. पर्यावरण दिवस, वसुंधरा दिवस हे सर्व वातानुकूलीत सभागृहात चमचमीत सामिष भोजनावर हात मारुन साजरे होणारे दिवस आहेत. मराठवाडयात सोलापूर, औरंगाबाद महामार्ग निर्मितीमध्ये कित्येक हजार वट वृक्षांनी त्यांची आहुती दिली. त्यांचे एखादे स्मारक उभारुन तेथे हा दिवस का साजरा करु नये? मला कधीतरी उगाच वाटते या रस्त्याच्या लांबीचे

प्रतिक म्हणून एक हिरवे वस्त्र तयार करुन त्यावर बळी गेलेल्या वटवृक्षाचे श्वेत ठिपके पसरुन त्यांचे शाळा महाविद्यालयात या दिवशी प्रदर्शन करावे आणि वसुंधरेचे वस्त्रहरण म्हणजे काय हे येणाऱ्या पिढीस सांगावे. महामार्ग अथवा विकास यास माझा विरोध नाही मात्र जेवढी झाडे गेली त्यांचा पुनर्जन्म रस्ता निर्माण होण्याआधीच सहज शक्य होता पण आम्हाला कुऱ्हाड ती सुध्दा यांत्रिक करवतीच्या आकारात असेल तर एका रात्रीत होत्याचे नव्हते करण्याचे शिक्षण आहे मात्र निर्मितीचे नाही याचे दुःख होते. वसुंधरेचे हरित वस्त्र किती शोभिवंत आणि सुंदर असते हे पाहण्यासाठी मी कितीतरी जणांना माझे समाज सेवेचे कार्यक्षेत्र असलेल्या जव्हार मधील दुर्गम अदिवासी भागात येण्याचे आमंत्रण दिले पण लग्न समारंभ, विदेश दौरा, वाढदिवस, दूरचा प्रवास, गरिबी पहावत नाही अशी कारणे देवून नकार घंटाचाच प्रतिध्वनी जास्त वाजत होता. वसुंधरा आणि तिचे वस्त्र याचा अर्थ सर्व प्रथम आपण समजावून घेतला पाहिजे. वस्त्र हे लज्जा रक्षणासाठी असते हे आपणास माहिती आहे मग वसुंधरेचे लज्जा रक्षण करणे हे आपले कर्तव्य नव्हे काय? त्याची सुरवात आपल्यापासून करावयाची हे सुध्दा तेवढेच महत्वाचे आहे. रस्त्यावरील उभे झाड हे वसुंधरेच्या वस्त्राचाच एक भाग आहे. पडलेला कचरा, प्लॅस्टिक, घाण, अस्वच्छता तिच्या वस्त्रावरील डाग आहेत. ते पडू न देण्यासाठी आपण सर्वानींच हातात हात गुंफावयास हवे. लहानपणी गरिबीमुळे शाळेत जाताना अनेक वेळा मी ढिगळाचा सदरा वापरत असे पण तो स्वच्छ असे, नंतर दसरा, दिवाळीला त्याची जागा नवीन सदरा घेत असे. वसुधरेच्या वस्त्राचे सुध्दा असेच आहे. तिच्यावर ढिगळ बसविण्याची वेळ आली तर ते नेहमीच गर्द हिरव्या रंगाचे असावे जेणे करुन ते वस्त्र तिच्या मुळ रंगाला शोभिवंत दिसेल. आज वातावरण बदल, वैश्विक उष्णतामान अशी मोठे संकटे जगासमोर उभी आहेत. जेथे द्रोपदी असते तेथे दुःशासनाची छाया असतेच आणि तिच्या साठी श्रीकृष्णाच्या मदतीचा मजबूत हात सुध्दा असतो. आज दुःशासनाची संख्या वाढताना पाहून वाईट वाटते म्हणूनच आपणास सर्वांनीच कृष्णाच्या भुमिकेत गेले तरच वंसुधरेचे हे वस्त्रहरण थांबवता येणे सहज शक्य आहे. स्त्रीच्या अंगावरील शुभ्र श्वेत वस्त्र सुजाण व्यक्तिच्या संवेदनशील मनाला नेहमीच पीळ पाडते, ती वेळ आपल्या पृथ्वीमातेवर येऊ नये म्हणून हे चार शब्द.

◆

**डॉ. नागेश टकाळे**
मोबा. ९८६९६१२५३१

